# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

# प्रेसनोट

**2021**

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक १४.११.२०२१

## सायबर सेल, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचेकडून नागरिकांना आवाहन

देशातील व महाराष्ट्रतील काही भागात घडलेल्या अप्रिय घटनेच्या अनुषंगाने धार्मिक भावना भडकाविणाऱ्या काही अक्षेपार्ह पोस्ट, खोटया बातम्या प्रसारीत करणारे ऑडिओ/व्हिडिओ व संदेश सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. आशाप्रकारच्या पोस्ट ऑडिओ/व्हिडिओ फॉरवर्ड करू नये. अशा अक्षेपार्ह पोस्ट प्राप्त झाल्यास त्या-त्या समाज माध्यमांवर रिपोर्ट करावे. सामाजिक शांतता भंग करणारे, समाजविघातक व्हिडिओ, पोस्ट, संदेश, सोशल मिडियावर व्हायरल करणे कायदयाने गुन्हा आहे. अशा प्रकारच्या पोस्ट/व्हिडिओवर लक्ष ठेवण्याबाबत फेसबुक, इंन्स्टाग्राम, ट्विटर, व्हॉटसअप इत्यादी सर्व सार्वजनिक माध्यमांना कळविण्यात आले आहेत.

सोशल मिडिया व इंटरनेटच्या माध्यमातुन पोस्ट करताना सामाजिक भान ठेवत माहिती तंत्रज्ञान अधिनियम २०००, (**IT ACT 2000**) मधील तरतुदींची काटेकोरपणे पालन करावे. व्हॅटसअप वापरणारे/ ग्रुप मध्ये असणारे सर्व सदस्य विशेषत: ग्रुप अॅडमिनने आपल्या ग्रुप मध्ये अशा प्रकारचे पोस्ट किंवा व्हिडिओ प्रसारीत होणार नाही यांची विशेष दक्षता घ्यावी. कोणत्याही अफवांवर विश्वाास ठेवू नये. सायबर विभाग गुन्हे शाखा, नवी मुंबई यांच्याकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, अशा प्रकारचे धार्मिक भावना भडकविणारे व खोटया बातम्या प्रसारीत करणारे व्हिडिओ किंवा पोस्ट प्रसारीत करू नये. तसेच अशा प्रकारची अक्षेपार्ह व्हिडिओ, पोस्ट करताना कोणीही आढळुन आल्यास त्याची माहिती त्वरीत नजिकच्या पोलीस ठाणेस देण्यात यावी.

★★★★★★★★★★